प्राथमिक शिक्षणाची व्याख्या व स्तर (इ.१ ली ते ८ वी)(Elementary Cycle ) मध्ये सुधारणा.
बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ प्रमाणे

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः प्राशातु-१११२/(२५८/२०१२)/प्राशि-३.

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १३ फेब्रुवारी, २०१३.

वाचा —

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९.

२) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११.

प्रस्तावना —

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी सुमारे ३२५७३ शाळा खाजगी आहेत. (अनुदानित २०,४५५, विना अनुदानित १२,०१८)

२. सध्या राज्यात इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत दिल्या जाणा-या शिक्षणाला वेगवेगळया परिस्थितीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संबोधण्यातयेते:-

| | | | |
|---|---|---|---|
| i) | इ.१ ली ते ४ थी चे वर्ग असणारी शाळा | - | प्राथमिक |
| ii) | इ.१ ली ते ७ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च प्राथमिक |
| iii) | इ.१ ली ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | - | माध्यमिक |
| iv) | इ.१ ली ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च माध्यमिक |
| v) | इ.५ वी ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | - | माध्यमिक |
| vi) | इ.५ वी ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च माध्यमिक |
| vii) | इ.८ वी ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | - | माध्यमिक |
| viii | इ.८ वी ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च माध्यमिक |

वरील वर्गीकरणामुळे शैक्षणिक स्तराच्या रचनेत एकवाक्यता राहत नाही आणि काम करत असताना संदिग्धता निर्माण होते.

३. सन २००२ मध्ये भारतीय घटनेत दुरुस्ती करुन ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इ. १ ली ते ८ वी) त्याचा मुलभूत अधिकार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम, २००९" हा कायदा पारीत केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून सुरु झालेली आहे. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने "महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११" नियम अधिसूचित केलेले आहेत.

४. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील काही ठळक कलमे खालीप्रमाणे आहेत:-

(i) कलम-२(f) Elementary Education means the education from first class to eighth class

(ii) कलम-३ (१) Every child of the age of six to fourteen years shall have a right to free and compulsory education in a neighbourhood school till completion of elementary education.

(iii) कलम - ६ For carrying out the provisions of this Act, the appropriate Government and the local authority shall establish, within such area or limits of neighbourhood, as may be

prescribed, a school, where it is not so established, within a period of three years from the commencement of this Act.

(iv) कलम-८(b)- Ensure availability of neighbourhood school as specified in section ६"

(v) "'महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११.

कलम-२ (m) खालीलप्रमाणे आहे :-

:-"Neighbourhood school" means a school in respect of children in Class I-V, a school shall be established as far as possible within a distance of one k.m. of the neighbourhood and has minimum of २० children in the age group of ६ to ११ years available and willing for enrollment in that school in classes VI-VIII, a school shall be established as far as possible within a distance of ३ k.m.s of the neighbourhood and which has not less than २० children in class ५th of the feeding primary schools, taken together, available and willing for enrollment in that school.

५. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम, २००९ मधील वरील तरतूदी लक्षात घेता, राज्यात सध्या प्रचलित प्राथमिक शिक्षणाची व्याख्या व त्याचा स्तरामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबीचा विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय—

राज्यामध्ये इथून पुढे इ. १ ली ते ८ वी पर्यंत शिक्षण खालीलप्रमाणे संबोधण्यात येणार आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| i) | इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत शिक्षण | - | प्राथमिक शिक्षण |
| ii) | इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत शिक्षण | - | कनिष्ठ प्राथमिक व |
| iii) | इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत शिक्षण | - | वरिष्ठ प्राथमिक |

तसेच इयत्ता ९ वी ते १० वी पर्यंत माध्यमिक शिक्षण व इयत्ता ११ वी ते १२ वी पर्यंत उच्च माध्यमिक शिक्षण म्हणून संबोधण्यात येईल.

२. हा शैक्षणिकस्तर राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व माध्यमाच्या (शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित, कायम विना अनुदानित इत्यादी) अशा सर्व शाळांना लागू राहील.

३. ज्या शाळामध्ये प्राथमिक शिक्षण ( इयत्ता १ ली ते ८ वी ) दिले जात आहे. त्या सर्व शाळांना (त्या कोणत्याही व्यवस्थापनाच्या व कोणत्याही नावांने ओळखल्या जाणा-या असो) "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९" च्या तरतूदी लागू राहतील व त्याचे तंतोतंत पालन करण्याची सर्व जबाबदारी त्या शाळांची राहील.

४. सध्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा करुन इथून पुढे प्राथमिक शिक्षणाशी (इयत्ता १ ली ते ८वी) निगडीत सर्व बाबींची जबाबदारी खालील अधिकारी यंची राहील

| | | | |
|---|---|---|---|
| i) | राज्यस्तरावर | - | शिक्षण संचालक (प्राथमिक) |
| ii) | विभागीय स्तरावर | - | विभागीय शिक्षण उपसंचालक |
| iii) | जिल्हा स्तरावर | - | जिल्हाशिक्षणाधिकारी(प्राथमिक) |

तसेच इयत्ता ९ वी ते १० वी (माध्यमिक) व इयत्ता ११ वी ते १२ वी (उच्च माध्यमिक) संदर्भात सर्व बाबीची जबाबदारी ही खालीलप्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| i) | राज्यस्तरावर | - | शिक्षण संचालक (माध्यमिक) |
| ii) | विभागीय स्तरावर | - | विभागीय शिक्षण उपसंचालक |
| iii) | जिल्हा स्तरावर | - | जिल्हाशिक्षणाधिकारी(माध्यमिक) |

५. "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९" ची दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक (प्राथमिक व माध्यमिक), यांनी योग्य ती कार्यवाही करावी व आवश्यकतेप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२१३१४१९२५०८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.05.06 16:23:30 +05'30'

(ना.उ.रौराळे)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुंबई,

३. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,

४. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)

५. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगीसचिव,

६. मा.राज्यमंत्री यंचे खाजगी सचिव (सर्व)

७. मा.सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य विधान भवन, मुंबई

८. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक

९. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

१०. सर्व प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

११. सर्व महानगरपालिका आयुक्त

१२. मा.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

१३. सर्व जिल्हाधिकारी

१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

१६. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

१७. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

१८. शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

१९. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

२०. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

२१. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.

२२. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

२३. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

२४. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ) जिल्हा परिषदा

२५. सर्व मुख्याधिकारी, नपगरपालिका/नगर परिषद

२६. निवड नस्ती (कार्यासन प्राशि-१/ प्राशि- ३)